CNR No. MHRG040032712025 दाखल तारीख : १५/०९/२०२५
नोंदणी तारीख : १५/१०/२०२५
निकाल तारीख : १६/०३/२०२६
कालावधी : ०० व. ०६ म. ०१ दि.

**<u>२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल यांचे न्यायालयात, पनवेल,</u>**
**जिल्हा - रायगड**
**(पिठासीन अधिकारी : ए.एस. बडगुजर)**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१४०८/२०२५**
**निशाणी क्र.१५/ब**

**१. मनोज किसन जाधव**
वय- ५० वर्षे, धंदा- नोकरी,
रा. सदनिका क्र. बी-३०२, हरी प्रिया सी.एच.एस.
प्लॉट क्र.२०, सेक्टर-१२, नवीन पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६

**२. महेश किसन जाधव**
वय- ४९ वर्षे, धंदा- नोकरी,
रा. सदनिका क्र. ०३, प्लॉट क्र.२३,
ईगल को.ऑप.हौसिंग सोसायटी, सेक्टर-३, नवीन पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६

**३. भाग्यश्री अशोक मोरे**
वय- ४८ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. सदनिका क्र. अ-१०१, प्लॉट क्र.३९,४५,४६,४७,
नील रेसिडेन्सी, सेक्टर-३, नवीन पनवेल (पुर्व),
ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ **... अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही **... सामनेवाले**

.......................................................................................
अर्जदारांतर्फे विधिज्ञ – प्रगती डी. ठाकूर.
.......................................................................................

## - न्यायनिर्णय -
## (घोषित दिनांक १६/०३/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला मिळणेकरीता अर्जदारांनी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील किसन दिनकर जाधव हे दिनांक २०/०६/२०२५ रोजी एम.जी.एम. हॉस्पीटल, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाले. मयत किसन दिनकर जाधव यांची आई देवकाबाई दिनकर जाधव या दिनांक २३/०३/२०१८ रोजी मयत झालेल्या आहेत व मयत किसन दिनकर जाधव यांची पत्नी कुंदा किसन जाधव या दिनांक १६/०७/२०२५ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत किसन दिनकर जाधव यांच्या पश्चात अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. मयत किसन दिनकर जाधव यांच्या मालकीच्या सदनिका क्र.०३, प्लॉट क्र.२३, ईगल को.ऑप.हौसिंग सोसायटी, सेक्टर-३, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड व दुकान क्र.४, तळमजला, ओमकार दर्शन, प्लॉट नं.३६ व ३७, सेक्टर ३, नवीन पनवेल (पुर्व), ता. पनवेल, जि. रायगड या मिळकती आहेत.

३. अर्जदार क्र.१ यांनी त्यांचे साक्ष शपथपत्र निशाणी क्र.११ अन्वये दाखल केले आहे. त्यांनी त्यामध्ये अर्जात सांगितलेल्या बाबी नमुद केल्या आहेत. अर्जदार यांनी अभिलेखावर यादी निशाणी क्र.४ अन्वये अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या आधारकार्डची प्रत, अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या रेशनकार्डची प्रत, मयत किसन दिनकर जाधव यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत, मयत कुंदा किसन जाधव यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत, खरेदीखतांच्या प्रती, मयत देवकाबाई दिनकर जाधव यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत अशी

कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अर्जदार यांनी निशाणी क्र.१२ अन्वये पुरावा बंद पुरशीस दाखल केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाबाबत 'दैनिक किल्ले रायगड' या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस दिनांक १२/११/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. न्यायालयीन बेलीफ मार्फत केलेला जाहीरनामा व त्याचा अहवाल, दवंडीपावती निशाणी क्र.७ वर आहे. प्रस्तुत अर्जाला दिलेल्या मुदतीत ते आजतागायत कोणीही हरकत घेतलेली नाही.

५. कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसते की, अर्जदार हे मयत किसन दिनकर जाधव यांचे कायदेशीर वारस आहेत.

६. वरील परिस्थिती पाहता असे म्हणावे लागेल की, या प्रकरणामध्ये अर्जदार हे मयत किसन दिनकर जाधव यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. करीता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**: आदेश :**

१. अर्जदार क्र.१ मनोज किसन जाधव, अर्जदार क्र.२ महेश किसन जाधव व अर्जदार क्र.३ भाग्यश्री अशोक मोरे हे मयत किसन दिनकर जाधव यांचे कायदेशीर वारस आहेत.

२. अर्जदार क्र.१ मनोज किसन जाधव, अर्जदार क्र.२ महेश किसन जाधव व अर्जदार क्र.३ भाग्यश्री अशोक मोरे यांना वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) नियमानुसार स्टॅम्प डयुटी आकारून निर्गमित करण्यात यावे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2026.03.18 10:41:07 +0530

पनवेल
दिनांक : १६/०३/२०२६.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल.